सत्यमेव जयते

**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
**नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, 1, बी.जे. रोड, पुणे-01**

दुरध्वनी क्र. 020-26122846/47 Email:- agricredit16@gmail.com

जा.क्र./कृषीपत-08/कृषिपशुसंवर्धनव्यापसयो/2026/२३०२ दिनांक :- 15/10/2026

# -: परिपत्रक :-

**विषय:- पशुपालकांना किसान क्रेडिट कार्ड योजनेतंर्गत बँकांकडून दिल्या जाणा-या रुपये दोन लाखापर्यतच्या अल्प मुदतीचे खेळते भांडवली कर्जावर राज्य शासनामार्फत 4 टक्के व्याज परतावा सवलत देणेबाबतची योजना.**

संदर्भ —1. कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय पविआ-0325/प्र.क्र.74/पदुम-3, दि. 31/07/2025 व दि. 11/02/2026.
2 शासनाच्या सहकार विभागाकडील पत्र क्रमांक संकिर्ण- 1025/प्र.क्र. 276/18-स, दि. 04/09/2026.

संदर्भिय शासन निर्णय दि. 31/07/2025 अन्वये पशुपालकांच्या उत्पनात वाढ होण्याबरोबरच राज्याच्या सकल उत्पन्नात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टिने पशुपालकांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच स्थानिक रोजगार निर्मितीसाठी पशुसंवर्धन व्यवसायास कृषि समकक्ष दर्जा देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच पशुपालन व्यवसायासाठी आवश्यक असणा-या खेळत्या भांडवलासाठी घेण्यात येणा-या कर्जावरील व्याज दरात राज्य शासनाकडून 4% व्याज परतावा सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संदर्भिय शासन निर्णय दि. 11/02/2026 अन्वये सदर व्याज सवलत देण्यासाठीची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. या शासन निर्णयानुसार सहकार विभागाकडील संदर्भिय दि. 04/09/2026 रोजीच्या पत्राद्वारे किसान क्रेडिट कार्ड धारकांनी पशुपालन व्यवसायासाठी घेतलेल्या अल्प मुदती खेळते भांडवली कर्जावरील व्याज सवलती बाबत बँकांना सूचना निर्गमित करणेबाबत कळविण्यात आले आहे.

राज्यातील किसान क्रेडिट कार्ड धारक पशुपालन व्यावसायासाठी व्याज परतावा सवलत योजना राबवण्याबाबतच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने योजना अंमलबजावणीबाबत खालीलप्रमाणे परिपत्रकीय सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

1. **योजनेचा उददेश** :- राज्यातील किसान क्रेडिटकार्ड धारक पशुपालन व्यावसायिकांना रुपये दोन लाखापर्यतचे अल्प मुदतीचे खेळते भांडवली कर्ज बिनव्याजी स्वरुपात उपलब्ध होण्यासाठी पशुपालन व्यावसायिकांना 4% दराने व्याज परतावा सवलत देणे.
2. **योजनेचे स्वरुप** :-
   - (i) केंद्र शासनाच्या धोरणानुसार पशुपालन व्यावसायासाठी वित्तीय संस्थांनी 7 % दराने कर्ज वितरण करणे अनिवार्य असून अशा कर्जाची परतफेड संबंधित पशुपालन व्यावसायीकांनी विहित मुदतीत केल्यास केंद्र शासनाकडून 3 % दराने व्याज परतावा सवलत (Prompt Repayment incentive) देण्यात येत आहे. या व्यतिरिक्त वर नमुद केल्याप्रमाणे राज्य शासनाकडून 4 % दराने व्याज परतावा सवलत देण्यात येत आहे.
   - (ii) सदरची योजना दि. 11/02/2026 पासून वित्तीय संस्थांकडून वितरित कर्जास लागू राहील.
   - (iii) वित्तीय संस्थेमध्ये राष्ट्रियकृत बँका, खाजगी क्षेत्रातील बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा समावेश राहील.

3) **योजने अंतर्गत पात्र कर्जदार व कर्जे :-**

i) पशुपालन व्यावसायिकांने वित्तीय संस्थेकडून किसान क्रेडिट कार्डद्वारे अल्प मुदती खेळते भांडवली कर्ज घेतलेले असावे.

ii) वित्तीय संस्थेने Scale of Finance च्या मर्यादेत वितरीत केलेल्या खेळते भांडवली कर्जामधील रुपये दोन लाखापर्यंतचे कर्जावर व्याज परतावा सवलत अनुज्ञेय राहील.

iii) खेळते भांडवली कर्जाची संपूर्ण परतफेड एक वर्षाच्या आत करणे आवश्यक राहील.

iv) पशुपालन प्रकल्पामधील सर्व पशुधनाची NDLM (भारत पशुधन) पोर्टलवर नोंदणी आवश्यक राहील.

v) व्याज परतावा सवलत खालीलप्रमाणे कमाल पशुधन संख्या असलेल्या पशुपालकांनाच अनुज्ञेय राहील.

क) 25000 मांसल कुक्कुट पक्षी / 50000 किंवा त्यापेक्षा कमी अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी

ख) 45000 किंवा त्यापेक्षा कमी क्षमतेच्या हॅचरी युनिट

ग) 100 किंवा त्यापेक्षा कमी दुधाळ जनावरांचा गोठा

घ) 500 किंवा त्यापेक्षा कमी शेळी / मेंढी गोठा

ङ) 200 किंवा त्यापेक्षा कमी वराह

vi) प्रकल्प धारकाने केंद्र / राज्य शासन / जिल्हा परिषदेच्या कोणत्याही अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

vii) या योजनेच्या निकषाप्रमाणे तसेच त्यामध्ये वेळोवेळी होणा-या बदलास अनुसरुन त्या बाबींची पूर्तता करणे लाभार्थ्यास बंधनकारक राहील.

viii) थकीत कर्जे त्याचप्रमाणे केवळ व्याज रक्कमेची वसुली करुन /वसुली न करता नुतनीकरण केलेली कर्जे योजने अंतर्गत लाभास पात्र असणार नाहीत.

4) **व्याज परतावा सवलत परिगणना :-**

अल्प मुदती खेळते भांडवली कर्जाच्या उचल तारखेपासुन संपुर्ण कर्ज परतफेडीच्या तारखेपर्यंत जेवढे दिवस कर्जाचा वापर झाला आहे तेवढया दिवसासाठी कमाल एक वर्ष / 365 दिवस व्याज परतावा सवलत रक्कमेची परिगणना करावी.

5) **व्याज परतावा सवलत मागणी /वितरण कार्यपध्दती :-**

i) **पशुपालन सहकारी संस्था/ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक:-** संबंधित संस्थांनी / बँकांनी या परिपत्रकाद्वारे विहीत केलेल्या विवरणपत्रामध्ये लाभ धारकांची यादी त्यांनी घेतलेले कर्ज, परत फेडीची रक्कम व दिनांक इत्यादी तपशीलासह व्याज परतावा सवलत मागणी संबंधित तालुका सहाय्यक / उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे चार प्रतीमध्ये दाखल करावी (सोबत नमुना 1 व 2).

सहाय्यक / उपनिबंधक यांनी सदर प्रस्तावाची संस्था अभिलेख्यानुसार तपासणी - छाननी करुन त्यांच्या अभिप्रायासह प्रस्ताव तीन प्रतीमध्ये जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे मंजुरीसाठी सादर करावा.

जिल्हा उपनिबंधक हे सहाय्यक / उपनिबंधकाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छानननी करुन प्रस्ताव मंजुर करतील व या कार्यालयाकडून उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदीमधुन रक्कमा कोषागारातुन आहरित करतील.

जिल्हा उपनिबंधक स्तरावर मंजुरी दिलेल्या प्रस्तावाची एक प्रत मंजुरीच्या शे-यासह संबंधीत संस्थेकडे पाठविण्यात यावी. तसेच जिल्हा उपनिबंधक यांचेकडून कोषागारातुन आहरित केलेली रक्कम

संबंधीत पशुपालन व्यावसायिकांच्या KCC / बचत खात्यात हस्तांतरीत करण्यासाठी संबंधित बँकेस दिली जाईल.

ii) **राष्ट्रीयीकृत बँका, खाजगी क्षेत्रातील बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका** :- या बँकांनी अनुदान मागणीचा प्रस्ताव विहीत नमुन्यात तयार करुन बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षकाकडुन तपासुन- प्रमाणित करुन घ्यावा व लेखापरीक्षकाच्या प्रमाणपत्रासह प्रस्ताव या कार्यालयाकडे दोन प्रतीत सादर करावा. (**सोबत नमुना** 1 **व** 2) या कार्यालयाकडून बँकांच्या प्रस्तावानुसार व्याज परतावा सवलतीची रक्कम बँकेस उपलब्ध करुन दिली जाईल. सदर रक्कम संबंधित लाभार्थ्यांच्या KCC / बचत खात्यामध्ये वर्ग करणे आवश्यक राहील.

6) **विनियोग दाखला (Utilization Certificate)** :- योजने अंतर्गत प्राप्त व्याज परतावा सवलत रक्कमेचा विनियोग दाखला जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी जिल्हा कोषागार कार्यालयाकडे देऊन त्याची प्रत या कार्यालयास द्यावी. तसेच **राष्ट्रीयीकृत बँका, खाजगी क्षेत्रातील बँका व प्रादेशिक ग्रामीण** बँकांनी प्राधिकृत अधिकारी यांच्या स्वस्वाक्षरीने विनियोग दाखला या कार्यालयाकडे सादर करावा.

Tawarc

**(दिपक तावरे, भा.प्र.से.)**
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे**

**प्रति:-**

1. मा. संयोजक, स्टेट लेव्हल बँकर्स कमिटी (SLBC) द्वारा बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे यांना विनंती करण्यांत येते की, सदर परिपत्रकाची प्रत सर्व सदस्य बँकांना उपलब्ध करुन द्यावी.
2. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व- मुंबई वगळुन) - त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रकाची प्रत जिल्हाधिकारी, जिल्हास्तरीय समन्वय समिती, जिल्हा अग्रणी व्यवस्थापक तसेच सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दुग्ध / पदुम यांना उपलब्ध करुन द्यावी.
3. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, सहकारी बँक लि. मुंबई
4. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रकाची प्रत सदस्य पशुपालन सहकारी संस्थांना उपलब्ध करुन द्यावी.

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव:-**

1. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन व लेखापरीक्षण- सर्व विभाग)
2. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-1, सहकारी संस्था (सर्व जिल्हे- मुंबई वगळुन)
3. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दुग्ध / पदुम, सर्व (जिल्हा उपनिबंधक यांचेमार्फत)

**प्रत माहितीकरिता :-**

1. मा. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
2. आयुक्त, पशुसंवधर्न महाराष्ट्र राज्य, पुणे स्पायसर कॉलेज समोर, औंध, पुणे.
3. मा.मुख्य महाप्रबंधक, राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) 54, वेलस्ली रोड, शिवाजीनगर, पुणे

# नमुना क्र.1

## (महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व पशुपालन सहकारी संस्था )

राज्यातील पशुपालन व्यावसायिकांसाठी 4% व्याज परतावा सवलत योजना – व्याज परतावा सवलत अनुदान मागणी प्रस्ताव

संस्थेचे / बँकेचे नांव :------------------------------------------------------------

कर्ज वाटप वर्ष / कालावधी -----------------------------------------------------------------

| अ.क्र. | तपशील | पशुपालन व्यावसायिकांची संख्या | कर्ज रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | वर्षातील केसीसीद्वारे एकुण अल्पमुदत खेळते भांडवली कर्ज वाटप | | |
| 2 | वरीलपैकी रुपये दोन लाखापर्यंतचे अल्पमुदती खेळते भांडवली कर्जवाटप | | |
| 3 | पैकी एक वर्षाच्या विहीत मुदतीत पुर्ण वसुल झालेली कर्ज खाती | | |
| 4 | वसुलीचे प्रमाण % | | |
| 5 | व्याज परतावा सवलत अनुदान मागणी @ 4% प्रमाणे एकूण रक्कम | | |

**सही/- संस्था सचिव/ व्यवस्थापक व अध्यक्ष**

# नमुना क्र.2

## (महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व पशुपालन सहकारी संस्था )

राज्यातील पशुपालन व्यावसायिकांसाठी 4% व्याज परतावा सवलत योजना – व्याज सवलत अनुदान मागणी प्रस्ताव

**संस्थेचे / बँकेचे नांव :**----------------------------------------------------------------------------------------

**बँक शाखा** ------------------------------ **IFS Code**----------------------**खाते क्र.**------------------------------

| अ. क्र | पशुपालन व्यावसायिकाचे पुर्ण नाव | पत्ता | KCC कर्ज खाते क्रमांक | कर्ज उचल | | कर्ज वसुली | | | | कर्ज वापर दिवस (कमाल 365 दिवस) | रुपये दोन लाखापर्यत च्या रक्कमेवर वार्षिक चार टक्के दराने व्याज सवलतीची रक्कम | KCC/ बचत खात्याचा क्रमांक (व्याज परतावा रक्कम जमा करण्यासाठी) | आधार क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दिनांक | रक्कम | दिनांक | मुद्दल | व्याज | एकूण | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| | | | | | | | | | | | | | |

**कर्ज वाटप वर्ष / कालावधी** -----------------------------------------------------

**प्रमाणपत्र** - प्रमाणित करण्यांत येते की, (1) उक्त विवरणपत्रामध्ये नमुद 1 ते --- लाभार्थी संस्थेचे / बँकेचे कर्जदार असुन विवरणपत्रात नमुद कर्जे ही दि. 11/02/2026 रोजीच्या शासन निर्णयात नमुद पशुपालन व्यवसायासाठी दिली आहेत. (2) सदर कर्जाची उचल / वाटप दिनांक 11/02/2026 नंतर झाली आहे. (3) उचल केलेल्या कर्जाची विहीत मुदतीत / एक वर्षाच्या आत संपुर्ण वसुली झाली आहे. (4) पशुपालकाने पशुधनाची NDLM भारत पशुधन पोर्टलवर नोंदणी केली आहे (5) पशुपालकाकडील पशुधनाची संख्या दिनांक 11/02/2026 रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमुद मर्यादेत आहे (6) पशुपालकाने केंद्र / राज्य शासन / जिल्हा परिषदेच्या कोणत्याही अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नाही. यामुळे सदर मत्स्यव्यावसायिक हे राज्य शासनाच्या पशुपालन व्यावसायिकांसाठी 4% व्याज परतावा सवलत योजने अंतर्गत लाभास पात्र आहेत.

**सही/- संस्था सचिव/ व्यवस्थापक व अध्यक्ष**

**सही- तपासणी अधिकारी**

## Form- 1 (For Commercial Banks)

**Interest Subvention Scheme for Farmers Engaged in Animal Husbandry Activities (Govt. of Maharashtra)**

Name of the Bank :- ------------------------------------------------------

**Year :-** 20 -- 20

| Sr. No. | Particulars | No. of Accounts | Amount Rs. |
|---|---|---|---|
| 1 | Total Number of branches in State | | N.A. |
| 2 | Out of the above no.1, Number of branches disbursing loans for Animal Husbandry Activities | | N.A. |
| 3 | Total Amount of KCC Short Term Working Capital loan disbursed for Animal Husbandry Activities during the year | | |
| 4 | Out of the above no. 3 , KCC ST WC loans up to Rs. two lakh | | |
| 5 | Out of the above no. 4, Number of Accounts with timely and Full repayment | | |
| 6 | Recovery percentage | | |
| 7 | Total Amount of Interest Subvention @ 4% | | |

**Seal and sd/-Authorised Officer of the Bank**

# Form- 2 (Commercial Banks)

## Interest Subvention Scheme for Farmers Engaged in Animal Husbandry Activities (Govt. of Maharashtra)

Bank Name:- ------------------------------------------------------------------------------------------------

List of eligible farmers for the period 20 - 20 who have availed the short term Working Capital Loan for Animal Husbandry Activity & have repaid fully in time

**Bank Account details** ------------------ **Branch Name** -------------- **IFS Code** --------------- **Account No.** -----------------------

| Sr. No. | Name of the Farmer | Address | KCC Loan Account No. | Loan Disbursement | | Recovery | | | | No. of days, loan utilized (Max 365 days) | Amount of Interest Subvention @ 4% on loan up to Rs. 2 lakh | KCC / Savings A/c no.(To deposit I.S. amount) | Aadhar No. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Date of Disbursement | Amount | Recovery Date | Principle | Interest | Total | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| | | | | | | | | | | | | | |

**Certificate-** Certified that
1) The above mentioned farmers have taken short-term working capital Loans for Animal Husbandry Activities from our bank as mentioned in GR dt. 11/02/2026
2) That the loans have been disbursed after 11/02/2026
3) That the farmers have repaid loans fully before due date and within a period of one year
4) That the farmers have registered live stock on NDLM Portal / Bharat Pashudhan
5) That the no. of live stock with the farmer is within the limit prescribed by GR dt. 11/02/2026
6) That the farmers have not received any subsidy for the project from Government of India / State Government / Zilla Parishad

And all the farmers are eligible for interest subvention benefit for animal Husbandry Activities (Govt. of Maharashtra)

**Seal and Signature of Statutory Auditor**

**Seal & Signature of Authorised Officer of the Bank**